# Three days

## “ Planning and Execution of Work ”

Part – B for Supporting Staff

( 29$^{Th}$ November To 01$^{st}$ December 2018)

## at Alibaug

ORGANIZED BY

**भारतीय विद्या भवनचे**

**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय**

**मुन्शी नगर, अंधेरी -पश्चिम, मुंबई - ४०० ०५८.**

सरदार पटेल अभियात्रिंकी महाविद्यालयातील ज्या शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी “Workshop on MS Office” या कार्यशाळेचा भाग- १ किंवा भाग -२ यशस्वीरित्या पूर्ण केला. सदर शिक्षकेत्तर कर्मचा-यांसाठी तीन दिवसीय **“ Planning and Execution of Work ”** हया विषयावर दिनांक २९ नोव्हेबर ते ०१ डिसेंबर २०१८ हया कालावधीत कार्यशाळेचे आयोजन C.C.E. अंतर्गत TEQIP- III च्या माध्यमातुन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे उपप्राचार्य व स्थापत्य विभागाचे प्रमुख डॉ. एम.एम.मुरुडी सर यांनी केले. त्यांनी ही कार्यशाळा घेण्यामागील हेतु उपस्थित कर्मचा-यांना समजावुन सांगितला. दैनदिन कामकाज व त्यांची अंमलबजावणी हयाविषयी त्यांनी अनेक मुद्दे समजावून सांगितले तसेच संस्थेने आतापर्यंत केलेल्या कामाचा व पुढे हाती घेतलेल्या कामाचा संक्षिप्त आढावा त्यांनी P.P.T. च्या माध्यमातुन सर्वांना समजावून सांगितला.



यांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. निलेश रायकर यांनी यांत्रिकी विभागाची कार्यदिशा कश्याप्रकारे चालली आहे या विषयी संर्वाना मागदर्शन केले.




पहिल्या दिवशी श्री. अनिल पाटील व सौ. मोना मॅडम यांनी दैनंदिन कामातील अडथळे व त्या संदर्भात सकारात्मक विचार यावर मार्गदशन केले.













कार्यशाळेच्या दुस-या दिवशी संस्थेचे विद्युत विभागाचे माजी विद्यार्थी श्री. अहुवालीया सर यांनी आनंदी जीवन यावर सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत अतीशय खेळीमेळीच्या वातावरणात व निरनिराळया उदाहरण देऊन मार्गदर्शन केले.











तद्दनंतर यांत्रिकी विभागातील श्री. लुईस डायस, इंजिन परिचर यांनी सकारात्मक दृष्टीकोन व श्री. संजय ज. सावंत, ग्रंथपाल यांनी कार्यालयीन कामकाजात सहकार्याची भुमिका याविषयी ससा व कासव यांच्या गोष्टीच्या सहाय्याने पटवून दिले. सौ. समिधा स. वालावलकर, लिपिक- टंकलेखक, कार्यालय यांनी सदर कोर्समुळे त्यांच्या कामात झालेला बदल व आपण कसे घडलो याविषयी आपले अनुभव सांगितले.












कार्यशाळेच्या तिस-या दिवशी श्री. अमोघ गोठूसकर यांनी आर्थिक साक्षरता या विषयावर बहूमोल असे मार्गदर्शन केले. आपण आपला दैनदिंन खर्च, आपली मिळकत व आपली गुंतवणूक हयाचा ताळमेळ जुळवून दाखविला.







कार्यक्रमाची सांगता संस्थेचे प्राचार्य डॉ. पी.एच.सावंत सर यांनी केली सुरुवातीस सर्व कर्मचा-यांना गेल्या तीन दिवसाच्या कार्यक्रमाविषयी आपला अभिप्राय व्यक्त केला. त्यावर भाष्य करताना डॉ. सावंत यांनी जीवनात MONEY, MANPOWER, MATERIAL, MIND, MACHINERY यांचा संदर्भ देऊन स्वत:च्या व आपल्या महाविद्यालयाच्या जडणघडणीसाठी आपण सकारात्मक दृष्टीकोणातुन विचार करुन आपल्या कार्याला उजाळी देऊ असे सांगितले.



शेवटी कार्यशाळेच्या को.ऑडीनेटर सौ विदयुलता पी. जोशी, सहयोगी प्राध्यापक, विदयुत विभाग यांनी कार्यशाळा आयोजित करण्यामागचे उद्दिष्ट सर्वांना समजावून सांगितले. कार्यशाळेचे को. को.ऑडीनेटर श्री. लुईस पी. डायस यांनी या तीन दिवसाचे योग्य प्रकारे आयोजन नियोजन केले. तसेच सौ समिधा स. वालावलकर यांनी आयोजक म्हणून ही कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न होण्यासाठी वेळोवेळी कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

